# पतसंस्थांमधील थकबाकीदारांची एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध होणार.



आपणांस कल्पना आहेच की, बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, ११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, घाटकोपर पोलिस स्टेशन समोर, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०० ०८६या पतसंस्थांच्या फेडरेशनने गेले ४ वर्षे सातत्याने प्रयत्न करून वरील विषयाचे संदर्भात www.mahasahakar.com ही वेबसाईट अस्तित्वात आणलेली आहे. या वेबसाईटमध्ये बृहन्मुंबईमधील नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या सर्व सभासद संस्थांना या वेबसाईटमध्ये सामील करून थकबाकीदारांची एकत्रीत यादी वेबसाईटवर उपलब्ध करून द्यावी हा ह्या वेबसाईटचा हेतू पुर्णपणे आता सफल झाला आहे. यापुर्वी दिनांक २/३/२००९ रोजी व आता दि. ३/९/२०१२ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. यांनी या वेबसाईटच्या निर्मितीला व त्यामध्ये सहभागी होण्यासाठी पतसंस्थांना एक प्रकारचे आवाहन करून मान्यता दिलेली आहे.

दि. २/३/२००९ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई – ४०० ००१. यांनी जे पत्र आपल्या फेडरेशनला दिलेले आहे, ते जसेच्या तसे आम्ही खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहोत.

Credit/CR1/329

1502

जा क्र विसनि/मुंबई/यूआरसी/बृमुनास/पत.फेड./ /०९
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,
मुंबई ४०० ००१.
दिनांक :- २/३/२००९

प्रति,
अध्यक्ष
बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन म.
११२,सोरभ बिल्डिंग,मोदी इस्टेट,एल.बी.एस.मार्ग,
घाटकोपर(पश्चिम)मुंबई ४० ०८६

**विषयः-** **फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईटचे नागरी सहकारी पतसंस्थानी सभासद होणेबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व फेडरेशन यांचे संयुक्त परिपत्रक काढणेबाबत...**

संदर्भः- आपले दि. १६/२/२००९ चे पत्र.

आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२/- नागरी सहकारी पतसंस्थानी सभासद होण्यासाठी आपल्या फेडरशेनच्या व या कार्यालयाच्या वतीने संयुक्त परिपत्रक काढणेसाठी पत्राची प्रत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे. सदर पत्रावर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांची स्वाक्षरी करुन या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई करीता

# विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई

व

# बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई

कार्यालय : ११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, एल.बी.एस.मार्ग, घाटकोपर (प.), मुंबई - ४०० ०८६.
दुरध्वनी : २५१५००९१/ ९२/ ९३ फॅक्स : २५१५००९४
वेब साईट : www.mahasahakar.com ईमेल contact@mahasahakar.com

दिनांक :

प्रति,

**मा. अध्यक्ष**

.................................................................

.................................................................

**विषय : विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई व बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाचे www.mahasahakar.com**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादितचे कार्यक्षेत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई शहर, पुर्व उपनगर जिल्हा व पश्चिम उपनगर जिल्हा असून बृहन्मुंबईतील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना थकीत कर्जवसूलीसाठी मदत होणे बाबत व नवीन कर्जदार कोणत्याही इतर संस्थेचा थकबाकी कर्जदार व जामिनदार(ज्यांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० कलम ९१ किंवा १०१ अन्वये वसुली दाखला मंजूर झाला असेल असा कर्जदार व जामिनदार)आहे किंवा नाही हे सदर वेबसाईटच्या माध्यमातुन सर्व वेबसाईट नोंदणीकृत संस्थाना तपासून पाहता येईल. परिणामी नवीन कर्जवाटप थकबाकीदारांसाठी होणार नाही. या वेबसाईटमध्ये पतसंस्थांना इतर अनेक प्रकारची उपयुक्त माहिती प्रसिध्द केलेली आहे.

तरी **www.mahasahakar.com** या वेबसाईटचे सभासद होणे साठी नोंदणी फॉर्म भरुन बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या कार्यालयात संपर्क साधून नियमाप्रमाणे सभासद व्हावे ही विनंती.

**(शिवाजीराव नलावडे)**
अध्यक्ष, बृहन्मुंबई नागरी सहकारी
पतसंस्था फेडरेशन मर्यादित मुंबई.

**(महेंद्र कल्याणकर)**
विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था मुंबई विभाग,मुंबई.

दि. ३१/०५/२०११ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई – ४०० ००१. यांनी जे पत्र आपल्या फेडरेशनला दिलेले आहे, ते पत्र जसेच्या तसे आपल्या माहितीसाठी प्रसिध्द करीत आहोत.

J:\Branches\Credit\letters\Credit 21 508

जा.क्र.विसनि/मुंबई/यूआरसी/बृ.ना.स.पत.फे/७५७७ /११
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,
मुंबई ४०० ००१.
दिनांक :३१ /०५ /२०११

प्रति
अध्यक्ष,
बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. मुंबई
११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट,
चिरागनगर पोलीस स्टेशन समोर,
लाल बहादूर शास्त्री मार्ग,
घाटकोपर (प). मुंबई ८६

विषय :- १. फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईट चे प्रात्यक्षिक दाखविणेसाठी वेळ मिळणेबाबत.
२.पतसंस्थांना वेबसाईटचे सभासद होणेसाठी फेडरेशन व आपल्या कार्यालयाच्या नावे संयुक्त परिपत्रक काढणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील जा.क्र. बृहन्मुंबई पतसंस्था फेडरेशन/६/२०११-१२, दिनांक ३०/४/२०११ रोजीचे पत्र.

आपले लक्ष वरील संदर्भिय विषयाकडे वेधण्यांत येत आहे.

२/- आपण www.mahasahakar.com या वेबसाईट ची निर्मिती केली असून सदर वेबसाईटचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी सोयीस्कर तारीख व वेळ देणेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे.

तरी उपरोक्त वेबसाईटचे प्रात्यक्षिक पहाण्यासाठी दिनांक १०/६/२०११ रोजी ~~सकाळी~~/दुपारी २.०० वाजता ही तारीख व वेळ देण्यात येत आहे.

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई

3/6/2011

तद्नंतर दि. ३/९/२०१२ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई – ४०० ००१. यांनी आपल्या फेडरेशनला जे पत्र लिहिलेले आहे ते पत्र जसेच्या तसे आपल्या माहितीसाठी प्रसिध्द करीत आहोत.

जा.क्र.विसनि/मुंबई/यूआरसी/पतसंस्था फेडरेशन/ ५०८९ १२
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,
मुंबई ४०० ००१. दिनांक :- 3 /9/२०१२

प्रति,
अध्यक्ष,
बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन म.
११२,सौरभ बिल्डींग,मोदी इस्टेट,एल.बी.एस.मार्ग,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४००० ८६.

विषय :- बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईटवर मुंबईतील नागरी सहकारी पतसंस्थामधील थकबाकीदार सभासदांची नांवे प्रसिध्द करणेबाबत
संदर्भ :- आपलेकडील दिनांक ६/८/१२ रोजीचे पत्र.

आपले लक्ष उपरोक्त संदर्भिय विषयाकडे वेधण्यांत येत आहे.

२/- नागरी सहकारी पतसंस्थानी फेडरेशनचे सभासदत्व स्विकारुन त्यांचेकडील उपलब्ध असलेले ॲवार्ड वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी लेखी आदेश काढावेत अशी आपण या कार्यालयास विनंती केलेली आहे.तरी या पत्रासोबत सर्व सहकारी पतसंस्थानी उपरोक्त उपक्रमात आवश्यक तो सहभाग घ्यावा असे परिपत्रक स्वाक्षरी करुन जोडून पाठविण्यांत येत आहे.

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई

तद्नंतर त्याच दिवशी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई – ४०० ००१. यांनी जे पत्र आपल्या फेडरेशनला जे पत्र लिहिलेले आहे ते जसेच्या तसे आपल्या माहितीसाठी प्रसिध्द करीत आहोत.

Z:\Branches\Credit\letters 456

456

४०८९

जा.क्र.विसनि/मुंबई/यूआरसी/पतसंस्था फेडरेशन/ १२
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,
मुंबई ४०० ००१. दिनांक :- ३ /८/२०१२

परिपत्रक :-

विषय :- बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईटवर मुंबईतील नागरी सहकारी पतसंस्थामधील थकबाकीदार सभासदांची नांवे प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :- बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या,मुंबई यांचेकडील दिनांक ६/८/१२ रोजीचे पत्र.

बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.मुंबई या फेडरेशने सहकारी पतसंस्थाना सहाय्य ठरेल व सर्व थकबाकीदार कर्जदाराची माहिती सर्व संस्थाना मिळून त्यांना त्यांच्या कर्जवितरणामध्ये थकबाकीदार सभासदांस कर्ज वाटपात समावेश होणार नाही व परिणामी संस्था वसुलीस सहकार्य मिळून संस्थेची आर्थिक स्थिती उंचावेल अशा करिता सर्व थकबाकीदाराची माहिती एकाच ठिकाणी मिळणेसाठी माहिती महाजालावर साईट विकसित करुन माहिती उपलब्ध करुन देणेचा एक उपक्रम राबविला आहे.अशा उपक्रमास सर्व सहकारी पतसंस्था जरुर ते सहकार्य करणे, हे सहकाराचे दृष्टीने उपयुक्त आहे.याचा विचार करुन सर्व सहकारी पतसंस्थानी त्याच्या उपक्रमात आवश्यक तो सहभाग घ्यावा अशी विनंती करणेत येत आहे.

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई

प्रति,
चेअरमन/सेक्रेटरी,
------------------------
------------------------
------------------------

वरील सर्व पत्रव्यवहारावरून मुंबईतील सर्व पतसंस्थांच्या आम्ही लक्षात आणून देवू इच्छितो की, **सर्व नागरी सहकारी पतसंस्थांनी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे प्रथम सभासद होणे आवश्यक आहे.** सुदैवाने ७५ टक्के पतसंस्था आपल्या ह्या फेडरेशनच्या यापुर्वीच सभासद झालेल्या आहेत. उरलेल्या सर्व २५ टक्के पतसंस्थांनी सुध्दा सभासद व्हावे हे या निमित्ताने आम्ही विनंतीपुर्वक आवाहन करीत आहोत.

बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या १०० टक्के सभासद झालेल्या सभासद पतसंस्थांनी आपल्या www.mahasahakar.com या वेबसाईटचे सभासद होणे आता अपरिहार्य व आवश्यक होवून बसलेले आहे. **मुंबई शहरातील १८०० च्या वर असलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अनेक सभासदांनी एकापेक्षा जास्त पतसंस्थांमध्ये सभासदत्व स्विकारून अनेक पतसंस्थांना थकबाकीच्या कचाट्यात सापडविले आहे.** कुठली व्यक्ती कुठल्या पतसंस्थेत थकबाकीदार आहे, हे समजण्यास कुठलीही व्यवस्था शासनाकडे आत्तापर्यंत उपलब्ध नव्हती. म्हणून ज्या महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई (नोंदणी क्र. बी.ओ.एम. / (बी.ओ.एम.) /आर.एस.आर./ (ए.एन.सी)/ १०१/८६-८७) यांना नोंदणी प्रमाणपत्र देवून सन १९८६ साली मुंबईतील सर्व पतसंस्थांसाठी कार्यक्षेत्र उपलब्ध करून दिले आहे. त्या आपल्या फेडरेशनने शासनाच्या कामाचा एक भाग म्हणून किंबहुना पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या सुरक्षिततेचा एक भाग म्हणून हे क्रांतीकारक पाऊल www.mahasahakar.com या वेबसाईट मार्फत उचलेले आहे.

आपल्या बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनमध्ये जी नागरी सहकारी पतसंस्था मुंबई पुर्व उपनगरे, मुंबई पश्चिम उपनगरे व मुंबई शहर म्हणजे संपुर्ण बृहन्मुंबईत नोंदणीकृत झालेली आहे व ज्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र १ वॉर्ड किंवा एका वॉर्डापेत्रा अनेक वॉर्ड किंवा १ संपुर्ण जिल्हा किंवा संपुर्ण मुंबई शहर किंवा संपुर्ण महाराष्ट्र राज्य असले तरी अशा प्रत्येक पतसंस्थेला आपल्या या फेडरेशनमध्ये सभासद सहजपणे होता येवू शकते. किंबहुना **या सर्व पतसंस्थांनी आपल्या या फेडरेशनचे सभासद विहीत नमुन्यातील सभासद अर्ज भरून जरूर व्हावे ही विनंती.** फेरडेशनच्या सभासदत्वासाठी प्रवेश शुल्क रू. ५/- व भाग रक्कम रू. १०००/- याप्रमाणे रू. १००५/- विहीत नमुन्यात सभासद अर्ज करून धनादेशाद्वारे देणे आवश्यक आहे. ज्या पतसंस्थांनी केवळ रू. १००/- भरून सभासदत्व स्विकारलेले आहे, त्या सर्व पतसंस्थांनी उर्वरित ९००/- किंवा

रूपये १०००/- भअगाची रक्कम पुर्ण करण्यासाठी लागणारी आवश्यक रक्कम फेडरेशनच्या नावाने धनादेशाद्वारे पाठविणे आवश्यक आहे. शिवाय प्रती वर्षी सभासद झाल्यानंतर देखील फेडरेशनचे उपविधी क्र. ड १.१ (५) प्रमाणे वार्षिक वर्गणी म्हणून रू. १००/- फेडरेशनच्या नावाने फेडरेशनला देणे आवश्यक व बंधनकारक आहे.

वरीलप्रमाणे जी पतसंस्था सभासदत्वासाठी वर्गणीसह पात्र आहे, ती प्रत्येक पतसंस्था फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईट सभासदत्वासाठी पात्र ठरणार आहे. **व या वेबसाईटचे शुल्क प्रती वर्षी रू. १०००/- असे आहे.** एकदा एवादी पतसंस्था वेबसाईटची सभासद झाल्यानंतर त्या वर्षामध्ये आपल्या नागरी सहकारी पतसंस्थेकडे जे महाराष्ट्र सहकार कायदा १९६० चे कलम ९१ व कलम १०१ चे ॲवॉर्ड आपल्याकडे प्राप्त आहेत, त्याचप्रमाणे निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ प्रमाणे आपणांकडे ॲवॉर्ड प्राप्त आहेत, त्या सर्व ॲवॉर्डच्या प्रमाणित २ प्रती फेडरेशनकडे ताबडतोब जमा करणे आवश्यक आहे. आणि **याप्रमाणे फेडरेशनच्या वेबसाईटचे सभासद झाल्यानंतर आपल्या प्रत्येक पतसंस्थेस बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन या वेबसाईटचा युजर आयडी व पासवर्ड हा देण्यात येईल**. व हा युजर आयडी व पासवर्ड देताना त्याचा वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण सुध्दा त्याचक्षणी पतसंस्था ज्यास प्राधिकृत करेल त्यांना देण्यात येईल. अशाप्रमाणे संपुर्ण मुंबईतील पतसंस्थांनी आपल्याकडील वरील महाराष्ट्र सहकार कायदा १९६० चे कलम ९१ व कलम १०१ चे ॲवॉर्ड आपल्याकडे प्राप्त आहेत, त्याचप्रमाणे निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अंतर्गत चे ॲवॉर्ड फेडरेशनकडे सादर केल्यानंतर ७ दिवसांच्या आत ते बेवसाईटवर अपलोड केले जातील. **ते ॲवॉर्ड अपलोड करताना कर्जदार व जामिनदारांची नावे, त्यांचा घरचा, कामाचा / व्यवसायाचा, गावचा पत्ता, ज्या पतसंस्थेकडून कर्ज घेतले त्या पतसंस्थेचे नाव व पत्ता, नोंदणी क्रमांक, थकबाकी ॲवॉर्ड प्राप्त झाल्याची तारीख, ॲवॉर्ड देणाऱ्या रजिस्ट्रारचे नाव, ॲवॉर्डची रक्कम इत्यादी आवश्यक तपशील वेबसाईटवर अपलोड केला जाईल.** प्रत्येक पतसंस्था नवीन कुठल्याही कर्ज अर्जदारास / सभासदास कर्ज देताना आपल्या या फेडरेशनने दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड चा प्रथम वापर करून हे नवीन सभासद / कर्ज अर्जदार मुंबईत अन्य कुठल्या पतसंस्थेत थकीत आहे किंवा नाही हे काही सेकंदात पतसंस्थेस माहिती पडणार आहे आहे. त्यामुळे जी व्यक्ती अन्य पतसंस्थेमध्ये सुध्दा थकबाकीदार झाल्याचे ह्या वेबसाईटमुळे माहिती झाले आहे त्या व्यक्तीस कुठलीही पतसंस्था

पुन्हा कर्ज देण्याच्या संदर्भात निश्चितपणे धाडस करणार नाही. आणि **एकदा एखादी व्यक्ती / सभासद / कर्ज मागणीदार / जामीनदार हे दुसऱ्या पतसंस्थेमध्ये थकबाकीदार आहे हे माहित पडले तर त्या थकबाकीदारांना त्या संस्थेची थकबाकी पुर्ण भरल्याशिवाय आपल्या पतसंस्थेत कर्जाची मागणी सुध्दा करण्यास आपोआप प्रतिबंध बसेल.**

थोडक्यात थकबाकीदारांना पायबंद घालणेसाठी व यापुर्वी ज्यांनी विविध पतसंस्थांमध्ये थकबाकी करून पतसंस्थांना अडचणीत आणले आहे व केवळ पतसंस्थांना थकबाकीदारांची व जामीनदारांची माहिती नसल्यामुळे आपल्या बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या www.mahasahakar.com या वेबसाईटने ह्यावर हा उपाय शोधला आहे. एकंदरीत ठेवीदारांच्या संरक्षणासाठी व शासनाची सुध्दा डोकेदुखी कमी व्हावी या उदात्त हेतूने महापरिश्रम करून बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशने ही वेबसाईट अस्तित्वात आणलेली आहे.

पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात संख्येने वाढ होणे, ठेवी वाढणे, पतसंस्थांना मोठ–मोठे पुरस्कार मिळणे, मेळावे घेणे याच्या पलिकडे थकबाकी वसुलीचे आव्हान हे अत्यंत अग्रस्थानी आहे हे सर्वांना समजून देण्यासाठी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने हे पाऊल उचलले आहे.

**बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या या कामाची व्याप्ती महाराष्ट्र शासन व सहकार खात्याच्या सहकार्याने भारतीय रिझर्व्ह बँकेला विश्वासात घेवून या विषयाची मोठ्या प्रमाणावर किमान महाराष्ट्र स्तरावर व्याप्ती वाढवावी यासाठी नागरी सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका त्याचप्रमाणे विविध कार्यकारी संस्था या सर्वांना एकत्रीत करून या स्तरावर मोठे मॉडेल सरकारने राबवावे यासाठी ही सुरूवात बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने केलेली आहे**. एक व्यक्ती एकापेक्षा अनेक ठिकाणी कर्जदार होणे हेच मुळात बंद होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी विविध कायद्यामध्ये बदल करून थकबाकीदारांची किड समूळ नष्ट करणे यासाठी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने हे पाऊल उचलले आहे. हे काम करण्यासाठी प्रचंड मानसिक बळ, निधी व सरकारच्या संपुर्ण सहकार्याची अपेक्षा आहे. परंतु उपलब्ध साधनाच्या आधारे हे काम बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने चालू केल्यामुळे बृहन्मुंबईतील अनेक पतसंस्थांनी www.mahasahakar.com या वेबसाईटचे सभासदत्व स्विकारून त्यांचेकडील उपलब्ध ॲवॉर्ड देण्यास यापुर्वीच सुरूवात केली आहे, याची संपुर्ण व्याप्ती प्रथम किमान मुंबईतील सर्व पतसंस्थांमध्ये होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व

नियमाप्रमाणे सर्व बाबींची पुर्तता करून ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी उचललेला या पावलास सहकार्य करावे ही विनंती या निमित्ताने करीत आहोत.

या फेडरेशनच्या या वेबसाईटचे सभासद होणेसाठी फेडरेशनचे प्रतिनिधी आपणांकडे निश्चितपणे येतच आहे, परंतु आपण स्वत:हून खालील पत्त्यावर फेडरेशनचे सभासद व वेबसाईटचे सभासद होणेसाठी व आपल्याकडील ॲवॉर्ड फेडरेशनकडे सुपुर्त करण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| **फेडरेशनचे नाव** | : | **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई** |
| **फेडरेशनचा पत्ता** | : | **११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, घाटकोपर पोलिस स्टेशन समोर, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०० ०८६.** |
| **फेडरेशनच्या वेबसाईटचे नाव** | : | **www.mahasahakar.com** |
| **फेडरेशनची कार्यालयीन वेळ** | : | **सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत.** |
| **फेडरेशनचे संपर्क क्रमांक** | : | **ऑफीस : ०२२-२५१५००९१, फॅक्स : ०२२-२५१५००९४** |

**युवराज मुळूक (व्यवस्थापक) : ९८२०२५४६६६ / अशोक वायकर : ९१६७४१०९९९**
**प्रमोद पाताडे : ९९२०७८०३३३ / सौ. निता शिंदे : ९९२०९५८१६२**

तरी थकबाकीच्या जटील समस्येवर शोधलेल्या उपायास आपल्या पतसंस्थेने **www.mahasahakar.com** या वेबसाईटचे जरूर सभासद व्हावे ही विनंती.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**